## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क. ४२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–२०/०७/२०१६.

**१) अश्लिल शब्दात शिविगाळ व मारण्या पिटण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १९/०७/२०१६ रोजी १८.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. प्रिति राजेश डोंगरे वय २८ वर्ष, रा. शहरवार्ड अडयाळ ही आपल्या घरी हजर असतांना यातील आरोपीने दारुपाणी पिवुन तीचे घरात येवुन 'मला घराचा हिस्सा पाहीजे' तु गाव सोडुन ईथे कशाला आली असे भांडण करुन फिर्यादीचे गालावर थापडाने मारुन तिचे कपडे फाडुन अश्लिल शब्दात शिविगाळ केली व जिवाने मारण्यापिटण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५४(ब),४४८,३२३,२९४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहे.

**२) नौकरीची आमीष दाखवून पैश्याची फसवणुक केली . :–**

दिनांक २७/०४/२०१४ चे आज पावेतो यातील फिर्यादी वनविभागात चपराशी या पदावर नौकरी लावुन देतो असे आमिष दाखवुन १,५०,०००/–रु. ची मागणी केली असता फिर्यादीने रक्कम दिली व नौकरी बाबत आरोपीस विचारणा केली असता आरोपी क्र. १ जुगल किशोर चव्हान वय ५२ वर्ष, रा. जिजाऊ गोविंद नगर राऊत वाडी ने बनावटी कागदपत्र तयार करुन ते खरे आहेत असे सांगुन खरे म्हणुन वापरले तसेच आरोपी अस्पाक अली अजगर अली वय ५० वर्ष रा. पदमा वार्ड पवनी व रविन्द्र मधुकर डिब्बे वय ३४ वर्ष रा. गोसे खुर्द यांनी संगनमत करुन खोटे कागदपत्रावर खोटी नकली मोहर लावुन फिर्यादीस ती खरी असल्याचे भासवुन त्याची फसवुन केली. असे फिर्यादी अजय दादाजी हुकरे वय २४ वर्ष, रा. दिघोरी मोठी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४६५,४६८,४७१,४७३,४२०,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो.स्टे. दिघोरी हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २०/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ५ केसस, तिन सिटर वाहनांवरती १५ केसेस व इतर वाहनांवरती ११९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**( श्री.बी.आर.गाडे)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

20/7/16